दिनांक :– २८.०७.२०२२

## प्रेसनोट

**आरोपी लोकसेवक सुभाष मारोती राऊत वय ५२ वर्ष व्यवसाय तलाठी सज्जा पिंपळगाव स. मि. ता. जि. परभणी रा. राजपार्क, राज गॅलॅक्सी जी, मालेगाव रोड, नांदेड यांचे विरूध्द १,५००/–रू. च्या लाचेची मागणी करून ती स्विकारल्या प्रकरणी गुन्हा दाखल व अटक.**

---

दि. २६.०७.२०२२ रोजी तक्रारदार यांनी पोलीस उप अधीक्षक श्री किरण बिडवे, अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, परभणी यांचेकडे तलाठी सज्जा पिंपळगाव (स. मि.) येथील तलाठी आलोसे सुभाष मारोती राऊत हे तक्रारदार यांना त्यांचे शेतजमीनीचा फेरफार करुन त्याची नोंद ७/१२ वर करुन देण्यासाठी २,०००/–रू. लाचेची मागणी करीत आहे. वगैरे मजकुराची तक्रार दिली. त्यावरून अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी यांनी दोन शासकिय पंच बोलावुन कृषी सारथी कॉलनी, परभणी येथील तलाठी सुभाष मारोती राऊत यांचे खाजगी कार्यालय येथे पंचा समक्ष तक्रारदार यांचे तक्रारी अनुषंगाने लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्यांत आली. पडताळणी मध्ये आलोसे सुभाष मारोती राऊत यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/–रू. लाचेची मागणी करून तडजोडअंती १,५००/–रुपये लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली त्यावरून दि. २७.०७.२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे सुभाष मारोती राऊत यांनी सदर लाचेची रक्कम १,५००/–रुपये त्याचे कृषी सारथी कॉलनी, परभणी येथील खाजगी कार्यालय स्विकारली.

तक्रारदार यांच्या फिर्यादी वरुन आलोसे सुभाष मारोती राऊत वय ५२ वर्ष व्यवसाय तलाठी सज्जा पिंपळगाव स. मि. ता. जि. परभणी रा. राजपार्क, राज गॅलॅक्सी जी, मालेगाव रोड, नांदेड यांचे विरूध्द पोलीस ठाणे नवा मोंढा, परभणी येथे गुरनं ३३२/२०२२ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आलोसे सुभाष मारोती राऊत यांना सदर गुन्हयात अटक करण्यांत आली आहे. मा. विशेष न्यायालय, परभणी यांनी आलोसे यांची दिनांक २९.०७.२०२२ रोजी पावेतो (०१ दिवस) पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

सदरची यशस्वी सापळा कारवाई मा. डॉ. राजकुमार शिंदे पोलीस अधीक्षक, व श्री. धरमसिंग चव्हाण अपर पोलीस अधीक्षक लाप्रवि नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली लाप्रवि परभणी युनिट येथील श्री किरण बिडवे, पोलीस उप अधीक्षक, श्री सदानंद वाघमारे पोलीस निरीक्षक, श्री बसवेश्वर जकीकोरे पोलीस निरीक्षक, पोह/अनिल कटारे, चंद्रशेखर निलपत्रेवार, चापोना/जनार्धन कदम, पोशि/अतुल कदम यांनी केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास श्री संदानंद वाघमारे पोलीस निरीक्षक, लाप्रवि, परभणी हे करीत आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, परभणी तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, परभणी येथे संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आंहे.

**टोल फ्री क्र.१०६४** **Email ID - dyspacbparbhani@gmail.com** **दुरध्वनी क्र.०२४५२–२२०५९७**

| | |
|---|---|
| मा. डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड | - ९६२३९९९९४४ |
| मां. श्री. धरमसिंग चव्हाण, अप्पर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड | - ९९२३४१७०७६ |
| श्री. किरण बिडवे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी | - ७०२०२२४६३१ |
| श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी | - ९८२३६१६१४२ |
| श्री. बसवेश्वर जकीकोरे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी | - ९८८११४१२१८ |